ISSN: 2249-894X IMPACT FACTOR : 3.8014 (UIF) VOLUME - 6 | ISSUE - 8 | MAY - 2017

REVIEW OF RESEARCH

# "मराठवाड्यातील आदिवासी समुदाय आणि त्यांचे हक्क"

**स्वप्ना तुळशीराम संगमवार**
Ph .D. Scholar, Yeshwant College, Nanded.

**प्रस्तावना :**

महाराष्ट्रातील मराठवाडा या प्रादेशिक विभागात अनेक आदिवासी जमाती आहेत त्यात महादेवकोळी, ओरॉन आंध, गोड, भिल्ल कोळी मल्हार, इत्यादी जमाती असुन त्यांची संस्कृती, आचार- प्रणाली, बोलीभाषा, सण-उत्सव, धर्माचा प्रभाव, जादु-टोणा इत्यादी घटक एकमेकांपेक्षा थोड्याफार प्रमाणात वेगवेगळे असल्याचे दिसून येते. आदिवासी जमाती प्राचीन काळापासून डोंगर, दऱ्याखोऱ्यात घनदाट अरण्यात निवास करीत आहेत. तसेच जिथे पर्वत किंवा घनदाट आरण्ये नाहीत तिथेही आदिवासी जमाती आढळून येतात.

मराठवाड्यातील नांदेड, परभणी, बीड, जालना, औरंगाबाद, उस्मानाबाद, हिंगोली, लातूर या जिल्ह्यात आदिवासी समुदायाच्या विविध जमाती असल्याचे दिसून येते. मराठवाड्यातील आदिवासी जमातीमध्ये प्रामुख्याने भिल्ल, आंध, महादेव कोळी, गोंड व मन्नेरवारलू आदिवासी जमाती प्रामुख्याने वास्तव्यास आहेत. या जमातीमध्ये महादेव कोळी ही जमात प्रामुख्याने शेती व्यवसाय करणारी जमात आहे. भारतात ब्रिटिशांच्या आगमनानंतर आदिवासीच्या समस्थेत वाढ झालेली आहे. ब्रिटिशांनी आदिवासी लोकांना नियंत्रणात ठेवण्यासाठी आदिवासी समाज जीवनात ढवळाढवळ सुरु केली. त्यामुळे आदिवासीचे जंगल व वनजमिनीवरील हक्क कमि होत गेल्याचे दिसून येते. जंगल विषयक नवीन कायदे केले आदिवासीवर अन्याय अत्याचार केले गेले. त्याचाच परिणाम आदिवासीने ब्रिटिशा विरुद्ध उठाव केले. या उठावाचा परिणाम म्हणून ब्रिटिशाने आदिवासी क्षेत्र वेगळे करुन त्यांचे हितसंबंध सुरक्षित करण्याच्या दृष्टीने योजना आखण्याचा निर्णय घेतला. १९७४ मध्ये आदिवासीच्या अनुसुचित जिल्हा बाबतचा कायदा ब्रिटिश पार्लमेंटनी मंजूर केला. १९५३ च्या Govt. of India Act च्या ५२ (अ) अकलमानुसार आदिवासी जिल्ह्याचे पुर्नगठण करण्यात आले. १९४७ पर्यत आदिवासी करिता अनेक कायदे पास करण्यात आले. १९२२ मध्ये ठक्कर बाप्पा यांनी आदिवासीच्या हक्कासाठी गुजरातमध्ये भिल सेवा संघ नावाची संस्था काढली. त्या संस्थेमार्फत आदिवासी कल्याणाचे उपकृत महाराष्ट्रातील आदिवासी जिल्ह्यात राबविले. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आदिवासीच्या एकंदरीत परिस्थितीचे अवलोकन करुन शासनने २६ जाने १९५० रोजी अंमलात आलेल्या भारतीय संविधानात आदिवासी जमातीच्या संरक्षणाचे हक्क, शिक्षणविषयक हक्क धार्मिक व सामाजिक हक्क, राजकीय व आर्थिक बाबीची तरतुद केली.

## १. मराठवाड्यातील आदिवासी जमातीचे हक्क :-

जमिन मालकीबाबत व वनविषयक हक्क, सुरुवातीच्या काळामध्ये आदिवासी लोकांना जंगल संपत्ती वापरण्याबाबत मुक्त स्वातंत्र्य होते. एवढेच



नाही तर जंगलाचे ते राजे होते. जंगल संपत्ती हेच आदिवासीच्या उपजिवीकेचे मुख्य साधन होते. जंगलातून शिकार मिळत असायची फळे - कंदमुळे मिळायची. डिंग, मध गोळा करुन त्यावर आदिवासी समुदाय उपजिविका करत असे, परंतु ब्रिटिशांनी जंगले सरकारच्या नियंत्रणाखाली आणली त्यातच १९५२ मध्ये राष्ट्रीय वननीती जाहिर झाल्यानंतर आदिवासीच्या मालकीच्या असलेल्या पडित जमिनी शासनाने काढून घेतल्या. `परंपरेने स्वाभावाने आणि संस्कृतीने शांत, मुक्त, निर्भय आणि आनंदी असणा-या या डोंगर राजाची परिस्थिती मात्र दयनीय अशीच आहे.`(१) गावाशेजारची जंगले आदिवासींना वापरण्यास बंदी घातली. जंगल हा आदिवासीचा श्वास आहे. तेथून त्यांना हुसकावने म्हणजे माशाला पाण्याबाहेर काढण्यासारखे आहे. वनजमिनीवरील आदिवासीचा हक्क नियमित करुन शेतीमध्ये कशा सुधारणा करता येतील? यांची शासनाने उपाययोजना करावी. "इंग्रज सरकाच्या १८५४ व १८९४ च्या वनधोरण नियमात आदिवासीना जंगलातील उघड्या पडलेल्या वनजमिनीवर जंगलाचे कोणतेही नुकसान न करता शेती करण्याचा हक्क होता"(२)

## २. जमिनीवर आदिवासीचा हक्क :-

"आदिवासी आपली जमिन बिगर आदिवासीना विकू शकत नाही आणि बिगर आदिवासीही ही जमिन विकत घेऊ शकत नाही."(३) आदिवासीमधील शिक्षणाचा अभाव, आर्थिक कमजोरी यामुळे जमिनी असून ही ती योग्य प्रकारे कसली जात नव्हती. अशा परिस्थितीत बिगर आदिवासीना ती भाडेपट्ट्याने, कराराने देणे आणि त्या जमिनी स्वतःच पुन्हा कसणे, पैशाच्या जोरावर जमिनीचा विकास होतो; पण फायदा धनिकांचाच होतो. अशा प्रकारे त्यांचे शोषण होते. म्हणून १९३५ च्या 'सिमिंग्टन समितीने केलेल्या शिफारशी प्रमाणे जंगलातील जमिनी आदिवासींना शेतीसाठी देण्यात आल्या. त्या सर्व वनजमिनीवर फक्त आदिवासीचा हक्क राहिल असे त्यास नमूद करण्यात आले.'(४)

'आदिवासीची सावकाराच्या आर्थिक शोषनातुन मुक्त करण्यासाठी भारतीय संविधानातील कलम ४६ नुसार तरतुद करण्यात आली आहे. जमिनी घेणे देणे किंवा उसने पैसे घेणे शक्य नसल्यास पैसाची परतफेड करण्यासाठी वेठबिगारी त्या मालकाकडे मजुरी करणे. आदिवासी जमातीची त्याच्या अज्ञानामुळे व आर्थिक अडचणीमुळे मोठया प्रमाणात पिळवणूक होत असे, परंतु संविधानाच्या ४६ व्या कलमान्वे राज्यातील दुर्बल घटक विशेषतः अनुसुचित जमातीच्या शिक्षण आणि आर्थिक हित संबंधाची विशेष काळजी घेऊन उन्नती साधण्याचा तसेच सामाजिक अन्याय व सर्व प्रकारच्या शोषणापासून संरक्षण देऊन मुक्त करण्याचा प्रयत्न केला.(५)

## ३. लोकसभागृहात व विधानसभेत राखीव जागाः-

मराठवाड्यातील नव्हे तर संपूर्ण भारतातील आदिवासी समुदायाला लोकसभेत व त्याच्या राज्याच्या विघानसभेत प्रतिनिधीत्व मिळावे यासाठी भारतीय संविधानात विशेष तरतुद करण्यात आलेली आहे. 'कलम ३३० आणि ३३२ नुसार अनुसुचित जमातीला त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व मिळावे व आदिवासी समुदायाच्या अडचणी सभागृहाला कळाव्यात या करिता राखीव जागाची तरतुद केली आहे.'(६) त्यामुळे मराठवाड्यात अनेक जिल्हा परिषद अध्यक्ष, सदस्य सभापती, महापालिकेचे अध्यक्ष, सदस्य, सभापती, नगरपालिका अध्यक्ष, सदस्य, सभापती, पंचायत समिती अध्यक्ष, सदस्य, सभापती, ग्रामपंयातचे सरपंच, सदस्यासाठी राखीव जागा सुटते व त्याचा लाभही येथील आदिवासींना मिळतो.

## ४. सरकारी नोकऱ्यात हक्कः-

मराठवाड्यातील आदिवासी समुदायाचा सरकारी नोकऱ्यात हक्क आहे. आदिवासी जमातीचा विकास व सर्वांगीण कल्याण करण्यासाठी 'भारतीय संविधान कलम ३३ व्या कलमानुसार केंद्र आणि राज्य शासनाच्या सरकारी नोकऱ्यांमध्ये अनुसुचित जमातीच्या लोकासाठी राखीव जागा ठेवण्याचा प्रबंध केला आहे.'(७) केंद्रीय लोकसेवा आयोग, प्रादेशिक लोकसेवा आयोग, निवड मंडळ, अनुदानप्राप्त संस्था यामध्ये अनुसुचित

जमातीच्या सहस्यासाठी नोकरीत राखीव जागा ठेवणे बंधनकारक आहे. त्याच बरोबर किमान वयातील सवलत, गुणवतेच्या बाबतीत निकष, पदोन्नती संबंधी विशेष सवलती प्रदान केल्या आहेत.

**५. शैक्षणिक हक्क :-**

महाराष्ट्रातील आदिवासी जमातीच्या संरक्षणासाठी शिक्षणासाठी घटनात्मक तरतूदीचे स्पष्टीकरण २६ जाने १९५० रोजी अमलात आलेल्या राज्य घटनेत खालीलप्रमाणे करण्यात आले आहे.

१) मराठवाड्यातील विशेषतः संपूर्ण भारतातील आदिवासी जमातीना भारतीय संविधानाच्या कलम ४६ नुसार शिक्षणाचा हक्क प्रदान करण्यात आलेला आहे. आर्थिक विकास व सामाजिक न्याय व अन्य प्रकारच्या पिळवणूकीतून आदिवासीचे संरक्षण करण्याची जबाबदारी शासन संस्थेची आहे. '(८)

२) ज्या डोंगराळ किंवा अप्रगत प्रदेशात आदिवासी जमातीची लोकवस्ती जास्त आहे. अशा प्रदेश अनुसुचित प्रदेश म्हणून जाहिर करण्याचा अधिकार राष्ट्रपतीला देण्याची तरतुद भारतीय संविधानात करण्यात आलेली आहे. त्यामुळे अनुसुचित जमातीचा सर्वांगिन विकास होऊन आदिवासी समुदायाचे सर्व हक्क अबाधित राहतील.

३) आदिवासीवर होणाऱ्या अन्यायाची दखल घटनेच्या २३ व्या कलमाचे घेतली आहे. या कलमान्वये आदिवासीकडून कोणीही सक्तीने काम करुन घेऊ शकत नाही. बेडबिगारीला ठेवू शकत नाही आणि व्यक्तीचा अनैतिक व्यापार करु शकत नाही. १३ व २९ कलमाप्रमाणे इतरांसारखेच आदिवासी व्यक्तींना धार्मिक स्वातंत्र्य शैक्षणिक व सांस्कृतिक हक्क बहाल करण्यात आलेले आहेत.

४) घटनेच्या चौथ्या भागांतील १४७ व्या कलमाने आदिवासी जमातीसाठी मंत्रिपातळीवर स्वतंत्र खाते निर्माण केले आहे. स्वतंत्र मंत्री त्याच्या विकासासाठी असल्याने त्याचे कल्याण होऊ शकते. मात्र कलमात आणखी अशी एक तरतुद आहे (९) की, आदिवासी कल्याणासाठी मध्यवर्ती शासन व राज्यशासन यांना खास निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे.

५) अनुसुचित जाती व जमातीच्या हितरक्षणासाठी राज्य घटनेने केलेल्या तरतुदीच्या अंमलबजावणीसाठी सर्व बाबीची चौकशी करण्याचा अधिकार प्राप्त असलेल्या अनुसुचित जाती व जमाती आयुक्तांची नियुक्ती करण्याचा अधिकार संविधानाने राष्ट्रपतीला दिला आहे. या आयुक्ताकडून प्रतिवर्षी राष्ट्रपतीला अहवाल सादर केला जातो आणि राष्ट्रपतीकडून हा अहवाल संसदेला सादर केला जातो.

मराठवाड्यातील आदिवासी समुदायाला घटनेतील तरतुदीप्रमाणे मिळालेल्या हक्कांच्या संरक्षणा बरोबरच आदिवासी जमातीच्या विशेष कल्याणकारी योजना राबवून आणण्याच्या विचाराने पाऊल चालतांना दिसून येत आहे. भारतीय संविधानाने आदिवासी समुदायाच्या कल्याण कार्यक्रमात त्याच्या शिक्षणासाठी सोयी उपलब्ध करुन देण्यावर विशेष भर दिला जात आहे. त्याचबरोबर काही घटनात्मक हक्क देखील बहाल केल्याचे दिसते.

**निष्कर्ष:-**

१. मराठवाड्यातील दुर्गम अशा भागात आदिवासी समुदायाची वसाती आहे.

२. आदिवासीचे जंगल व वनजमिनीवरील हक्क स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील शासनाने कमि किंवा नष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

३. शासनाचे धोरण औघोगीकीकरणाला पोषक असल्यामुळे आदिवासी भागातील जंगल व आदिवासीच्या जमिनी नष्ट करण्यात आलेल्या आहेत.

४. गावा सभोवतालच्या जमिनी आदिवासींना शेती करण्यास न दिल्यामुळे आदिवासीच्या या जमिनीवरचा हक्क संपुष्टात आला.

५. भारतीय संविधानाने आदिवासी समुदायाची आर्थिक शैक्षणिक व सर्व प्रकारच्या शोषणातुन मुक्तता केलेली असली तरी शासनाच्या उदासिनतेमुळे आदिवासी समुदायाची म्हणावी तेवढी प्रगती झालेली नाही.

६. आजही सावकराचा आर्थिक शोषणातुन आदिवासी समुदायाची पूर्णतः मुक्तता झालेली दिसून येत नाही.

७. लोकसभेत व विधानसभेत आदिवासी समुदायाच्या लोकांसाठी, राखीव जागा भारतीय संविधानाने ठेवल्या आहेत; परंतु या राखीव जागेवर निवडून गेलेले आदिवासी प्रतिनिधी प्रस्थापित नेतृत्वाच्या आधीन झाल्याने

आदिवासीचे हक्क व आदिवासीच्या कल्याणासाठी असलेला निधी यांचे योग्य नियोजन होत नाही. त्यामुळे आदिवासी जमातीचे कल्याण हे कागदावरच झालेले असते. आणि वास्तविक परिस्थिती अतिशय भयावह आहे.

**समारोप :-**

मराठवाड्यातील नांदेड, परभणी, हिंगोली बीड, लातुर उस्मानाबाद औरंगाबाद व जालना या जिल्ह्यात आदिवासी समुदायाच्या विविध जमाती आहेत. यामध्ये प्रामुख्याने महादेव कोळी, भिल्ल, गौंड, मन्नेरवारलू व आंध आदिवासी ह्या जमाती आहेत. काही जमाती शेती व विविध पारंपरिक व्यवसाय करतात. या जमातीत शिक्षणाचे प्रमाण फार कमि असल्यामुळे त्यांना भारतीय संविधानाने मिळालेले हक्क व अधिकाराबाबत ते अनभिज्ञ आहेत. त्याच्यामध्ये शैक्षणिक व सामाजिक जागृती करुन त्याचे असलेले हक्क व अधिकाराबद्दल जाणीव आणखी निर्माण करावी लागेल. या बाबत मराठवाड्यात आदिवासी भागात काम करण्याची गरज आहे.

**संदर्भ सूची :-**

१. डॉ. सांळुखे संजय भा., *गोंड,* संवेदन प्रकाशन औरंगाबाद, २००२, पृ ४१.
२. लेले. आ. म., *जंगलच्या राजाला विकासाचे वेध,* आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पूणे, १९८८, पृ. २.
३. डॉ. कुलकर्णी शौनक, *महाराष्ट्रातील आदिवासी,* डायमंड प्रकाशन पुणे, २००९, पृ. १०३.
४. डि. सिमिंग्टन, *सिमिंग्टन अहवाल, शिफारशी व निष्कर्ष,* आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पूणे, १९३८.
५. डॉ. जिरेवाड लक्ष्मिकांत, *महाराष्ट्रतील आदिवासी मन्नरेवारलु जमात,* समृद्ध प्रकाशन बीड, २०१०, पृ. २११.
६. डॉ. देशमुख सुदर्शन, *आदिवासी समाजाचे दारिद्रय,* निर्मल प्रकाशन नांदड, २००७ पृ. ७२.
७. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, *भारताचे संविधान* (९४ च्या संविधान सुधारणेपर्यंत अद्यावत) मिलींद प्रकाशन वर्धा, आवृत्ती २०१० पृ. २१२.
८. कित्ता पृ. ८७.
९. डॉ. जिरेवाड लक्ष्मिकांत, पुर्वोक्त, पृ. २१२.